# T20/AGR225/EE/20160301

**वेळ : 3 तास** **गुण : 80**

**सूचना :**

1) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
2) प्रत्येक उप–प्रश्न पाच गुणांचा आहे.
3) प्रत्येक उप–प्रश्नाचे उत्तर 75 ते 100 शब्दांत लिहा.
4) पहिल्या ओळीमध्ये प्रश्न क्रमांक आणि उप–प्रश्न लिहिल्यानंतर उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर स्वतंत्र पृष्ठावर लिहावे.

---

1. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) फुलांचे सामाजिक महत्त्व स्पष्ट करा. 5

ब) आंबा व केळी या पिकांना कशा प्रकारचे हवामान लागते ते लिहा. 5

क) क्षारपड जमिनीची सुधारणा करण्याचे उपाय लिहा. 5

ड) फळझाडांसाठी लागवडीच्या पद्धती निवडतांना कोणकोणते मुद्दे लक्षात घ्यावेत? 5

इ) बागेच्या लागवडीपुर्वी जमिनीची पुर्वमशागत करणे का आवश्यक असते? 5

2. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) बागेत ताटवे ठेवण्याचे विविध फायदे लिहा. 5

ब) चुन्याचे (कॅल्शियम) वनस्पतीमधील कार्य व महत्त्व स्पष्ट करा. 5

क) जिवाणू खते वापरताना कोणती काळजी घ्यावी? 5

ड) सिंचनाच्या पद्धतींची नावे सांगून ठिबक सिंचन पद्धतीचे फायदे लिहा. 5

इ) फळझाडांमधील आच्छादनाचे विविध फायदे लिहा. 5

3. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) फळझाडांना वळण देण्याच्या सुधारित मुख्य खोडाच्या पद्धतीबद्दल माहिती लिहा. 5

ब) गर्डलिंग म्हणजे काय? गर्डलिंगचे तीन प्रकार नमूद करा. 5

क) वाढप्रतिबंधक संजीवकांची माहिती लिहा. 5

ड) तणनियंत्रणाच्या पद्धतींची थोडक्यात माहिती लिहा. 5

इ) पानावर क्रिया करणाऱ्या तणनाशकांचे थोडक्यात वर्णन करा. 5

4. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) रोगनियंत्रणाचे नैसर्गिक उपाय कोणते ते सविस्तर लिहा. 5

ब) रासायनिक किटकनाशकांचे वर्गीकरण किटकावरील परिणामानुसार लिहा. 5

क) फळांच्या परिपक्वतेचे मापदंड कोणते आहेत ते लिहा. 5

ड) भाजीपाल्याची काढणी केव्हा व कशी करावी? 5

इ) युरोपात निर्यात करावयाच्या फुलांमध्ये कोणते गुणधर्म असावेत? 5